**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
**गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२**
**Ph.:0253-2231714, 15 Ext 2002 http://-ycmou.diqitaluniversity.ac**
**E-mail: mwkchair@ycmou.ac.in**

**महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन**

**प्रेषक** : प्रा.विजयकुमार पाईकराव

**विषय** : संत कबीर संत तुकाराम शिक्षण प्रेरणा काव्य इतिवृत्त अहवाल

**प्रति** : मा. कुलगुरू

**दिनांक** : ११/११/२०२५

कृपया आपल्या कल्पक मार्गदर्शनातील अंतर्गत १४ वे पुष्प, अधयनार्थी व श्रोत्यांसाठी, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने यशवाणी रेडीओवर **"संत कबीर संत तुकाराम शिक्षण प्रेरणा काव्य"** या विषयावर, भारतीय सौर कार्तिक ९, शके १९४७ दि.३१/१०/२०२५ रोजी सकाळी १२ वाजता आयोजित केले होते. त्याचा इतिवृत्त अहवाल पुढीलप्रमाणे सविनय सादर.

**॥ इतिवृत्त अहवाल ॥**

मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आणि प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रेसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शना अंतर्गत १४ वे पुष्प, अधयनार्थी व श्रोत्यांसाठी, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने यशवाणी रेडीओवर **"संत कबीर संत तुकाराम शिक्षण प्रेरणा काव्य"** या विषयावर भारतीय सौर कार्तिक ९, शके १९४७ दि.३१/१०/२०२५ रोजी सकाळी १२ वाजता आयोजित केले होते. या परिसंवादात विद्यापीठातील प्रा.विजयकुमार पाईकराव यांनी आपले अभ्यासपूर्ण विचार प्रतिपादित केले. त्याचा सारांश पुढील प्रमाणे

संत कबीर यांचे दोहे आणि काव्य रचना शैक्षणिक, वैज्ञानिक आणि जिज्ञासा निर्माण करणारी आहेत. ती व्यवहारिक ज्ञान,अनुभव प्रेम इ. भावनेनी ओतपोत भरलेली आहे. ज्ञानाने परिपूर्ण असून सुद्धा विचार आचाराचा ताळमेळ घालू शकतो. तो संत कबीर आल्या दोह्या मधून चित्रित्त करतात.


पोथी पढी पढी जग मुआ
पंडित भया न कोय
ढाई आखर प्रेम का
पढे सो पंडित होय !

शिक्षकांचा शिक्षक, गुरूचा गुरू म्हणून संत-कबीराचे नाव घेता येईल. प्रगत विचारांच्या माध्यमातून पंधराव्या शतकातील संत कबीर यांनी नकळत एकविसाव्या शतकातल्या शिक्षणाचा पाया घातला हे मात्र खरे आहे. यांचे अनेक दोहे अध्यनार्थी, शिक्षक, पालकांना व समंत्रकांना दिशादर्शक ठरणारे आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये देखील हेच प्रतिपादित केलेले आहे.

ऐसी वाणी बोलिए, मन का आपा खोये ।
औरन को शीतल करें, आपहुं शीतल होएं ।।

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VCI/3109
दि. 11 / 11 /2025

**संत तुकारामाचा विद्रोह आणि वैज्ञानिक दृष्टीकोन** व प्रस्थापित अन्यायावर प्रश्न विचारायला त्यांनी आपल्या गाथेमधून व अभागांतून सांगितले आहे. अध्यनार्थी (विध्यार्थ्यांना) प्रश्न विचारायला शिकवण हे तर सध्या शिक्षण क्षेत्राच मर्म आहे. या समाज शिक्षणाची पाया भरणी त्यांनी केली.




जे का रंजले गांजले ।
त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा ।
देव तेथेचि जाणावा ।

दुसरे म्हणजे क्रीडा शिक्षणावर आधारित सुंदर अभंग त्यांनी रचले. या मधून संत तुकारामांनी त्या वेळी खेळल्या जाणऱ्या खेळांची यादीच दिली आहे.

बाळपणी ऐसी वरूषे गेली बारा ।
खेळता या पोरा नानामते ।।
विटी दांडू चेंडू लगोरया वाघोडी ।
चंपे पेंड घडी एकी बेकी ।।
हनामा हुंबरी पकव्याच्या बारे ।
खेळे जगी भोवरे चुंबाचुंबी ।।
सेलेडेरा आणि निसरभोवंडी ।
ऊचली बाळे धोंडी अंगबाळे ।।
तुका म्हणे ऐसे बाळपण गेले ।
मग तारूण्य आले गर्वमुळे ।।

अशा प्रकारे संत कबीर,संत तुकाराम यांची अभंग रचना व दोहे नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची पाया भरणी करणारे आहेत.

त्याची काही उदाहरणे :

बुरा जो देखन मैं चला,
बुरा न मिलिया कोय ।
जो मन देखा अपना,
मुझसे बुरा न कोय ।

म्हणजे, आपण लोकांकडे कसं पाहतो हे महत्त्वाचं. आपण मनात बाईट विचार केला तर सर्व बाईटच दिसेल. बाहेर कोणी बाईट नाही. आतूनच आपण बाईट विचार करतो.
कबीर ही एक व्यक्ती नसून विचार आहे. कबीर ना हिंदू होते ना मुसलमान. ते जातिधर्माच्या पार पलीकडचे होते. ते सत्शील माणूस होते आणि माणुसकी त्यांचा धर्म होता. संपूर्ण जगाला त्यांनी आरसा दाखवला समाजातल्या चुकीच्या रूढी, समजुती, अंधश्रद्धा यांचं सत्य स्वरूप त्यानी त्यांच्या दोह्यांमधून मांडलं.
म्हणजे, माया, पैसा, सत्ता यांमुळे अहंकारी होऊ नका. स्वतःच्या रंगाचा, दिसण्याचा, जातीचा गर्व करू नका. शरीर मातीसारखं आहे. हवेची झुळूक जरी आली तरी मातीची धूळ बनेल आणि उडून जाईल. जीवनाचं किती मोठ तत्त्वज्ञान कबीर सांगून गेले !
विद्यार्थ्यांना शाळेपासून हे सर्व शिकवलं तर त्यांचं मन अधिक उत्तम विचारांनी परिपूर्ण होईल. शाळेच्या प्रार्थनेमध्ये कबिरांचं भजन असलं पाहिजे. शाळा कॉलेजच्या विविध प्रकल्पांमध्ये त्यांच्या कवितांचा समावेश असला पाहिजे. आमच्या इस्पॅलिअर शाळेत दरवर्षी कबिरांच्या गाण्यांचं सादरीकरण असतं. कबिरांचे दोहे विद्यार्थ्यांना पाठ होतील, त्यांचा अर्थ ते समजून घेतील तर मोठेपणी त्यांना त्या ज्ञानाचा उपयोग होईल. आजकाल प्रत्येकजण तणावाखाली जगत असतो. त्यातून बरं होण्यासाठी डॉक्टरकडे जातो. थोडे दिवस बरं वाटतं; पण पुन्हा धडधड होते, काळी वाटते. यावर कबीरदास म्हणतात.


शिक्षणाचा पाया हा 'विचार' असतो. तोच विचार संत तुकारामांनी आपल्या अभंगांतून मांडला. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय संत आणि परंपरा यांची ओळख व्हावी म्हणून संतांचे अभंग सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिकवायला सांगितले आहेत. त्यावर परीक्षा घ्यायची नाही. पण त्याचा अर्थ त्यांना माहिती हवा. म्हणूनच शाळेतील विद्यार्थ्यांना तुकोबांचे अभंग शिकवायला हवेत. स्नेहसंमेलनात कार्यक्रम ठेवून संत तुकोबांचे अभंग पाठ करून घ्यायला पाहिजेत. यातूनच त्यांना संत साहित्याची ओळख होईल आणि त्यांची वैचारिक बैठक मजबूत होईल. पुण्याजवळ देहू येथे शासनातर्फे अतिशय भव्य असं गाथा मंदिर उभारण्यात आलं आहे. त्यामधील भिंतींवर संत तुकाराम लिखित सर्व अभंग कोरण्यात आलेले आहेत. सर्वच अध्यनार्थी, विद्यार्थ्यांसाठी ही त्यांच्यासाठी ज्ञानार्जनाची मोठी पर्वणी आहे. अन्याय सहन न करणारा, जीवनतत्त्वांच्या खऱ्या अर्थापर्यंत जाणारा माणूस त्यातून घडेल आणि तुकाराम महाराजांच्या '**आनंदाचे डोही आनंद तरंग, आनंदचि अंग आनंदाचे ।**' या ओळीचा भावार्थ अध्यनार्थी विद्यार्थ्यांना लक्षात येईल.

या उपक्रमाच्या यशस्वी नियोजनात दृक-श्राव्यकेंद्राचे प्रमुख प्रा. जदीप निकम यांचे मार्गदर्शनत तंत्रज्ञ श्री. गिरीश गवळ, समन्वयक श्री. प्रकाश सापनर या सर्वासाठी हा कार्यक्रम श्रवणासाठी यशवाणीच्या पोर्टवर उपलब्ध करून दिला आहे. या प्रेरणा काव्य यशस्वीतेसाठी श्री. राहुल पगारे यांनी सहकार्य केले.

अध्यायनार्थी श्रोत्यांनी आपल्या आवडीनी व सवडीनी कार्यक्रमाचे श्रवण करावे असे आवाहन

अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले आणि या यशवाणी आरोग्यसवांदाची यशस्वी सांगता झाली.

**व्याख्यानसत्राचे मा. कुलगुरूंचे मान्यता पत्र :**



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत संज्ञापन पत्र

प्रेषक : प्रा.विजयकुमार पाईकराव
विषय : संत कबीर संत तुकाराम शिक्षण प्रेरणा काव्य विचार यशवाणीबाबत....
प्रति : मा. कुलगुरू
दिनांक : ३०/१०/२०२५

उद्दिष्टे: माहितीसाठी/ विचारार्थ/मंजुरीसाठी/सूचना/निर्णयार्थ/कृतीसाठी/अवलोकनार्थ फिरविणे

कृपया महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने सर्वांसाठी व B.Ed.( P80)आणि ( P21 ) या शिक्षणक्रमच्या ( EDU 282) अध्ययनार्थीसाठी **"संत कबीर संत तुकाराम शिक्षण प्रेरणा काव्य विचार"** या विषयवार **प्रा.विजयकुमार पाईकराव** यांचे यशवाणी वेब रेडीओ व्याख्यानसत्र आयोजित करण्याचा मानस आहे. त्यास मान्यता द्यावी. ही विनंती. आदर व आभारसह !!

**प्रा.विजयकुमार पाईकराव**
**प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन**

मा. कुलगुरु
मान्य


मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VCI/3016
दि. 31 / 10 / 2025

**व्याख्यानसत्राची क्षणचित्रे :**






## व्याख्यानसत्राचे यशवाणी प्रपत्र :



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

मागणी - प्रपत्र

अभ्यासक्रमाधारित यशवाणी (Web Radio) कार्यक्रम

प्रेषक : संचालक/ प्रमुख महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

विषय : यशवाणी कार्यक्रम

धारीका :

प्रति : प्रमुख, दृक-श्राव्य केंद्र

दिनांक : 31/10/2025

योग्य तेथे इष्ट पर्यायासमोर ✓ अशी खूण करावी.

- प्रस्तावित कार्यक्रमाची भाषा : मराठी ✓ इंग्रजी ☐ हिन्दी ✓ उर्दु ☐
- प्रस्तावित कार्यक्रमाचे शिर्षक : संत कबीर, संत तुकाराम शिक्षण प्रेरणा काव्य विचार
- कोणत्या शिक्षणक्रमासाठी : P80 व P21
- कोणत्या अभ्यासक्रमासाठी : EDU 282 & MWDKC
- कार्यक्रमाचे एकूण भाग (No. of Episodes) : 01
- संबंधित विषय कोणासाठी : विद्यार्थी ✓ सर्वांसाठी ✓
- श्राव्य कार्यक्रमाचे स्वरुप कोणत्या प्रकारचे आहे. : निबंधात्मक ✓ संवादात्मक ☐ प्राथमिक माहितीपर ✓
- विषय तज्ञांचे नाव : प्रा. विजयकुमार पाईकराव
- विद्याशाखेचे/संस्थेचे/कॉलेजचे नाव : सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र प्रमुख, सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष व
- तपशिलवार पत्ता : महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन
- संबंधीत विषय प्रक्षेपणास योग्य आहे काय ? : होय ✓ नाही ☐
- प्रक्षेपण दिनांक आणि वेळ : 31.10.2025 दु. 12 ते 1

कार्यक्रम संयोजक
यशवाणी, दृक-श्राव्य केंद्र

प्रमुख
दृक-श्राव्य केंद्र

विद्याशाखा

संचालक

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२ २२२

प्रत :

